सकाळ
गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४



कोल्हापूर : शासकीय महापालिकास्तर थ्रो बॉल स्पर्धेत चौदा, सतरा, एकोणीस वर्षांखालील विजेत्या संघांसोबत मान्यवर उपस्थित होते.

# बावडेकर ॲकॅडमी, विवेकानंद विजयी

## शासकीय महापालिकास्तर शालेय थ्रो बॉल स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या थ्रो बॉल स्पर्धेत चौदा व सतरा वयोगटांत श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी, तर एकोणीस वर्षांखालील वयोगटात विवेकानंद कॉलेजने प्रतिस्पर्धी संघावर मात करीत विजेतेपद पटकाविले.

छत्रपती संभाजीनगरातील विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत चौदा वर्षांखालील मुलांमध्ये श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने राजर्षी शाहू हायस्कूल रिंगरोडचा १५-१, १५-१ अशा गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात वेदांत पावले, ईहान बागवान, वेदांत जाधव, राजवीर डकरे, यश जाधव, पवन सावदे, नमन चिवळकर, ज्ञान शेट्टी, जन्मजय निंबाळकर, आराध्य यादव, अर्णव राबाडे, आरुष पवार, क्रीडा शिक्षक ऋषीकेश पाटील यांचा समावेश होता. तिसरा क्रमांक आर. के. वालावलकर हायस्कूलने पटकाविला.

सतरा वर्षांखालील मुलांमध्ये श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोडचा १५-१०, १५-७ असा पराभव केला, तर तिसरा क्रमांक वसंतराव देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूलने पटकाविला.

विजयी संघात इंद्रनील वेल्हाळ, तन्मय मंडपे, श्लोक वाडकर, प्रसाद पवार, शार्विल रेगे, रुजुल फडणवीस, यश उत्पे, तुषार सालियर, तनिष्क खांडेकर, जयदीप आजगेकर, गुरुराज खांडेकर, अनिमेश देसाई यांचा समावेश होता.

एकोणीस वर्षांखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने माईसाहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूलचा १५-९, १५-६ असा पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात पार्थ जाधव, स्वयंम जिरगे, सोहम भोसले, सिद्धेश जगताप, सर्वेश पाटील, वृषभ पवार, मंत्र लोहार, प्रणव तळप, पार्श्वनाथ मगदूम, श्रीहरी पवार, धनराज सूर्यवंशी, शौर्य लिंग्रस, क्रीडाशिक्षक प्रा. संतोष कुंडले यांचा समावेश होता.

28/11/2024
29.11.24

तरुण भारत संवाद गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४

# माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी, विवेकानंद कॉलेज विजयी

▪ मनपास्तरीय थ्रो बॉल स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर



कोल्हापूर : मनपास्तर थ्रो बॉल स्पर्धेतील विजयी संघासोबत क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषिकेश पाटील आदी.

कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपास्तरील शालेय थ्रो बॉल स्पर्धा संपन्न झाल्या. छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल येथे स्पर्धा पार पडल्या. १४ व १७ वर्षाखालील सामन्यात श्रीमंत माईसाहेब बावडेकर ॲकॅडमी स्कूलने तर १९ वर्षाखालील सामन्यात विवेकानंद कॉलेजने विजय मिळविला. मनपा प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांचे अध्यक्षतेखाली व जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ, उपआयुक्त साधना पाटील, प्रशासनाधिकारी आर. व्ही. कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, ऋषीकेश पाटील यांनी आयोजन केले.

स्पर्धेचा निकाल असा :

**१४ वर्षाखालील सामना :** सेमी १ – राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड विजयविरुद्ध आर.के.वालावलकर हायस्कूल १५–५,१५–०, सेमी २ – श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय १५–३, १५–०, तृतीय क्रमांक सामना : श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय विजयविरुद्ध आर के वालावलकर हायस्कूल १५–४, १५–२ **अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजय विरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–१,१५–१

**विजयी संघ असा :** वेदांत पावले, ईहान बागवान, वेदांत जाधव, राजवीर डकरे, यश जाधव, पवन सावदे, नमन चिवळकर, ज्ञान शेट्टी, जन्मजय निंबाळकर, आराध्य यादव, अर्णव राबाडे, आरुष पवार, क्रीडा शिक्षक ऋषिकेश पाटील.

**१७ वर्षाखालील सामना :** सेमी १ – श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध व. ज. देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूल १५–१०,१५–७, सेमी २ – राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड विजय विरुद्ध राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल १५–९,१५–५, तृतीय क्रमांक सामना : व. ज. देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूल विजयविरुद्ध राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल १५–३, १५–३.

**अंतिम सामना :** श्रीमंत माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल विजयविरुद्ध राजर्षी शाहू हायस्कूल रिंग रोड १५–३, १५–२.

**विजयी संघ असा :** इंद्रनील वेल्हाळ, तन्मय मंडपे, प्रसाद पवार, श्लोक वाडकर, शर्विल, रेगे रुजूल फडणवीस यश उलपे तुषार सालियर तनिष्क खांडेकर जयदीप आजगेकर गुरुराज खांडेकर अनिमेश देसाई क्रीडा शिक्षक ऋषिकेश पाटील.

**१९ वर्षाखालील सामना :** सेमी १ – विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माईसाहेब बावडेकर अकॅडमी स्कूल १५–१, १५–१ अंतिम सामना : विवेकानंद कॉलेज विजयविरुद्ध माय साहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूल १५–९, १५–६.

**विजयी संघ असा :** पार्थ जाधव, स्वयंम जीरगे, सोहम भोसले, सिद्धेश जगताप, सर्वेश पाटील, वृषभ पवार, मंत्र लोहार, प्रणव तळप, पार्श्वनाथ मगदूम, श्रीहरी पवार धनराज सूर्यवंशी शौर्य लिंग्रस क्रीडा शिक्षक प्रा.संतोष कुंडल.

28/11/2024

29.11.24

हॅलो प्रभात

# विवेकानंदच्या फिल्म मेकींग विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील महाविद्यालयाच्या बी. व्होक. ॲनिमेशन अँड फिल्म मेकींग पदवी अभ्यासक्रमामध्ये शिकत असणाऱ्या एकूण पाच विद्यार्थ्यांची मुंबईच्या डायलॉग्ज मेडिया या कंपनीमध्ये स्क्रीप्ट् रायटींग आणि सिनेमॅटोग्राफी या पदासाठी निवड झाली आहे.

सदर विद्यार्थ्यांना पाच लाख रुपयाचे पॅकेज जाहीर झाले आहे. या विद्यार्थ्यांना बी. व्होक. ॲनिमेशनचे शिक्षण घेतानाच नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. सदर विद्यार्थ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत. दिग्वीजय पाटील, कामया खातिब, कु. संहिता मोरे, कु. ऋचा बराडे, सुमित इंगळे या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.



आर. कुंभार यांनी अभिनंदन केले असून त्यांना बी. व्होक. विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी व विभागप्रमुख प्रा. महेश माळी, प्रा. निखिल शिंगे, प्रा. अतुल पाटील, प्रा. अनिकेत कोरे , महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.